# नांदेड जिल्हा

नांदेड जिल्हयाचे क्षेत्रफळ १०५२८ चौ.कि.मी. असून सन २००१ चे जनगणनेनुसार लोकसंख्या २८७६२५९ आहे त्यामध्ये पुरुष १४.७६ लाख व स्त्रिया १३.९१ लाख आहेत. नागरी लोकसंख्या २८.२९ टक्के आहे. लोकसंख्येची घनता २७२ दर चौरस किमी आहे.

नांदेड जिल्हयाचे एकुण साक्षरतेचे प्रमाण ३८.५२ टक्के आहे. हवामान उष्ण व कोरडे असून सरासरी पर्जन्य ९५३.८ मिमी आहे. नांदेड जिल्हयामध्ये,नांदेड,मुदखेड,अर्धापुर,उमरी,भोकर,हिमायतनगर,किनवट,माहुर,हदगाव, नायगाव, बिलोली,धर्माबाद,देगलूर,मुखेड, कंधार,लोहा यापमाणे एकूण १६ तालुके आहेत. तसेच महानगरपालिका-१, नगरपालिका-११,ग्रामपंचायती १३१३ आहेत.

नांदेड जिल्हयातील २० व्या पशुगणनेनुसार एकुण मोठे पशुधन संख्या ७३८८१४ आहे व शेळया मेंढयाची संख्या ३९५४५७ आहे.

नांदेड जिल्हयात पशुवैदयकिय सेवा पुरविण्यासाठी राज्यस्तरीय व जिल्हा परिषदे अंतर्गत खालील प्रमाणे संस्था कार्यरत आहेत.

| राज्यस्तरीय | | | जिल्हा परिषद अंतर्गत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा पशुवैदयकिय सर्वचिकित्सालय | तालुका लघु पशुवैदयकिय सर्वचिकित्सालय | एकुण राज्यस्तरीय | पशुवैदयकिय दवाखाना श्रेणी-१ स्थानिकस्तर | पशुवैदयकिय दवाखाना श्रेणी-२ स्थानिकस्तर | फिरते पशुवैदयकिय दवाखाना | एकुण जिल्हा परिषद अंतर्गत | एकुण राज्य +जि.प |
| ०१ | ०५ | ०६ | पवैद श्रेणी-१ ७३,<br>लालकंधारी संवर्धन केंद्र गऊळ-०१<br>कुक्कुट प्रकल्प -०१<br>७३+१+१ =७५ | १०३ | ०१ | १७९ | १८४ |

# पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड
## मंजुर व रिक्त पदांची माहिती

अ ) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी  कार्यालय :-

| अ.क्रं | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी** | १ | १ | ० |
| २ | **पशुधन विकास अधिकारी (तां)** | १ | १ | ० |
| ३ | **सहायक प्रशासन अधिकारी** | १ | १ | ० |
| ४ | **कनिष्ठ प्रशसन अधिकारी** | १ | १ | ० |
| ५ | **वरिष्ठ सहाय्यक** | १ | १ | ० |
| ६ | **कनिष्ठ सहायक लेखा** | १ | १ | ० |
| ७ | **कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)** | १ | १ | ० |
| ८ | **परिचर** | २ | १ | १ |
| ९ | **वाहन चालक** | १ | १ | ० |

ब ) जिल्हा परिषद पशुवैदयकिय दवाखान्यावर कार्यरत :-

| अ.क्रं | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **पशुधन विकास अधिकारी** | ८४ | ७६ | ०८ |
| २ | **सहाय्यक पशुधन विकास अधिकारी** | २६ | २५ | ०१ |
| ३ | **पशुधन पर्यवेक्षक** | १३७ | ८३ | ५४ |
| ४ | **व्रणोपचारक** | ६८ | ४१ | २७ |

# पशुसंवर्धन विभागा जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध योजनांची संक्षिप्त माहिती.

१. जिल्हास्तरीय अनुसुचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटप.
सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ३७.०१ लक्ष . सदर तरतुदीतुन ७५ % अनुदानावर २७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. सदर योजनेत २ दुधाळ जनावरांचा गट प्रति लाभार्थीस पुरवठा करण्यता येतो.

२. जिल्हास्तरीय आदिवासी उपयोजना (टिएसपी) अंतर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटप सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ५.११ लक्ष तरतुद उपलब्ध तरतुदीतुन ७५ % अनुदानावर ०३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. सदर योजनेत २ दुधाळ जनावरांचा गट प्रति लाभार्थीस पुरवठा करण्यता येतो.

३. जिल्हास्तरीय आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना (ओटिएसपी) अंतर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटप. सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ९.५७ लक्ष तरतुद उपलब्ध तरतुदीतुन ७५ % अनुदानावर ७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. सदर योजनेत २ दुधाळ जनावरांचा गट प्रति लाभार्थीस पुरवठा करण्यता येतो.

४. जिल्हास्तरीय अनुसुचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत१०+१शेळी गट वाटप.
सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ३७.४० लक्ष तरतुद उपलब्ध तरतुदीतुन ७५ % अनुदानावर ४८ लाभार्थ्यांची निवड करुन ठेवण्यात आली आहे. परंतु निधी अभावी लाभ देण्यात आलेला नाही.

५. जिल्हास्तरीय आदिवासी उपयोजना (टिएसपी) अंतर्गत अंतर्गत १०+१ शेळी गट वाटप सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ४.२८ लक्ष तरतुद उपलब्ध तरतुदीतुन ७५ % अनुदानावर ०५ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे .

६. जिल्हास्तरीय आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना (ओटिएसपी) अंतर्गत१०+१शेळी गट वाटप.
सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ११.६५ लक्ष तरतुद उपलब्ध तरतुदीतुन ७५ % अनुदानावर १५ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे.

७. जिल्हा वार्षीक आदिवासी उपयोजने अंतर्गत वैरण विकास कार्यक्रम/ उत्पदनासाठी उत्तेजन या योजने अंतर्गत सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये ३.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदीतुन १००% आ ुदानावर १५००/- रुपयेच्या मर्यादेत २०० लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे

८. जिल्हा वार्षीक योजना (**सर्वसाधारण**) अंतर्गत वैरण व पशुखाद्य विकासासाठी अनुदान सदर योजना राबविणेसाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रुपये २७.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदीतुन १००% आ ुदानावर १५००/- रुपयेच्या मर्यादेत १८०० लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे